## शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका

## कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना

## फेरनिविदा क्र. 2

शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका यांचेकडून खालील तपषीलात नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था, व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतंर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल, पोस्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोस्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

| | |
|---|---|
| **1. कोरे निविदा प्रपत्र विक्री –** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शुक्रवार दि. 25 फेब्रुवारी, 2011 पासून ते शुक्रवार दि. 04 मार्च, 2011 पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त शिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल. |
| **2. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ –** | निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शनिवार दि. 05 मार्च, 2011 रोजी दुपारी 1.00 वाजे पर्यंत |
| **3. निविदा उघडण्याची वेळ** | शनिवार दि. 05 मार्च, 2011 रोजी दुपारी 3.00 वा किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. |
| **4. निविदा दर** | सर्व करांसह व वाहतुकींसह देणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | तपशील | तरतूद | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| 1 | विद्यार्थी सहल ( इ. 1 ली ते 2 री ) | 20,00,000/– | 2000/– |
| 2 | विद्यार्थी सहल ( इ. 3 री ते 5 वी ) | 1,00,00,000/– | 2000/– |
| 3 | विद्यार्थी सहल ( इ. 6 वी ते 7 वी ) | 60,00,000/– | 2000/– |

**सूचना –**

1. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा 1 टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म सोबत अटी, स्पेसिफिकेशन, निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेवून ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.
2. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा मा शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील
3. सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.punecorporation.org वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/–** | **स्वाक्षरी/–** |
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा** |

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**स्पेसिफिकेशन सन 2010 – 11**

**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – 05/03/2011**

**वेळ – दुपारी – 1.00 वा. पर्यंत**

**बयाणा रक्कम रुपये : 20,000/–**

**<u>सहल इ.1ली/2री</u>**

**लाभार्थी अंदाजे – 25,863**

1) **संभाव्य ठिकाणे : पुणे शहर दर्शन ठिकाणे –**

1. सर्पोद्यान – कात्रज
2. पु.ल. देशपांडे उद्यान – दत्तवाडी
3. सारसबाग – पर्वती
4. केळकर संग्रहालय
5. शनिवारवाडा – लालमहाल
6. संभाजी उद्यान – डेक्कन.

2) **सहल कालावधी : संभाव्य कालावधी 25 मार्च 2011 ते 31 मार्च 2011**

प्रतिदिन 3694 विद्यार्थी – 62 बसेस एकूण 7 दिवस

3) **सहल लाभार्थी खाऊ व्यवस्था : शिक्षण मंडळ कार्यालयाद्वारे**

4) **सहल लाभार्थी विमा : 25,863 विद्यार्थी एकदिवसीय प्रवासी, विमा**

5) **प्रवास बस : प्रतिदिन 62 बस आवश्यक**

स्वाक्षरी/–
अध्यक्ष
शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा

स्वाक्षरी/–
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**

**स्पेसिफिकेशन सन 2010 – 11**

**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – 05/03/2011**

**वेळ – दुपारी – 1.00 वा. पर्यंत**

**बयाणा रक्कम रुपये : 1,00,000/–**

**<u>सहल</u> इ. 3री ते इ. 5वी**

**लाभार्थी अंदाजे – 37,045**

1) **सहल ठिकाणे** : पुणे जिल्ह्यातील विविध शैक्षणिक ऐतिहासिक, मनोरंजनात्मक, भौगोलिक सहल स्थळे

अंदाजे टप्पा – 60 कि.मी. 100 कि.मी. व 150 किमी परतीसह तीनही टप्प्याचे स्वंतत्र दर द्यावेत

2) **सहल कालावधी : संभाव्य कालावधी 15 मार्च 2011 ते 24 मार्च 2011**

3) **सहल लाभार्थी अल्पोपहार** : सकाळी 10.00 वा. सहलस्थळी

मेनू : पोहे/इडली/शिरा/उपमा (पोटभर) यापैकी कोणताही एक

4) **सहल लाभार्थी जेवण** : दुपारी 1.00 वा. सहलस्थळी

मेनू : पुरी/चपाती, दोन भाजी (एक पातळ/एक सुकी) स्वीट, भात, वरण, पापड, कोषिंबीर इ. (अमर्यादित थाळी)

5) **सहल लाभार्थी प्रवास बस** : प्रतिदिन 62 बसेस आरटीओ मान्यताप्राप्त

6) **सहल लाभार्थी विमा व्यवस्था :**

1. एकदिवसीय प्रवासी विमा
2. सहल स्थळाचा संपूर्ण विमा

7) **सहलस्थळी सुरक्षा व्यवस्था :**

1. पुरेसे सुरक्षारक्षक
2. तज्ज्ञ डॉक्टर्स पथक ॲम्ब्यूलन्ससह व प्रथमोपचारासह

8) **पिण्याचे पाणी/बाथरूम** : सहल लाभार्थी संख्येनिहाय पुरेसे

**स्वाक्षरी/–**<br>**अध्यक्ष**<br>**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा**

**स्वाक्षरी/–**<br>**शिक्षण प्रमुख,**<br>**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा**

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन सन 2010 – 11**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक – 05/03/2011**
**वेळ – दुपारी – 1.00 वा. पर्यंत**
**बयाणा रक्कम रुपये : 60,000/–**
**सहल इ. 6वी ते इ. 7वी**
**लाभार्थी अंदाजे – 20,093**

1) **सहल ठिकाणे :** पुणे जिल्हयांतील विविध ऐतिहासिक गड – किल्ले, साखर कारखाने, धरणे, मनोरंजनात्मक व वैज्ञानिक प्रकल्प, इतर सहल ठिकाणे

**सहलीचे टप्पे पुढीलप्रमाणे –**

अ) 60 कि. मी. वरील सहल ठिकाणे

ब) 100 कि. मी. वरील सहल ठिकाणे

क) 150 कि. मी. वरील सहल ठिकाणे

ड) 200 कि. मी. वरील सहल ठिकाणे

**सहल अंतराच्या प्रत्येक टप्प्याचे स्वंतत्र दर द्यावेत.**

2) **सहल कालावधी : संभाव्य कालावधी 9 मार्च 2011 ते 14 मार्च 2011**

प्रति दिन 3348 विद्यार्थी 6 दिवस बस संख्या दररोज 56

3) **सहल लाभार्थी अल्पोपहार :** सकाळी 10.00 वा. सहलस्थळी

मेनू : पोहे/इडली/शिरा/उपमा (पोटभर) यापैकी कोणताही एक

4) **सहल लाभार्थी जेवण :** दुपारी 1.00 वा. सहलस्थळी

मेनू : पुरी/चपाती, दोन भाजी (एक पातळ/एक सुकी) स्वीट, भात, वरण, पापड, कोशिंबीर इ. (अमर्यादित थाळी)

5) **सहल लाभार्थी प्रवास बस :** प्रतिदिन 56 बसेस आरटीओ मान्यताप्राप्त

6) **सहल लाभार्थी विमा व्यवस्था :**

1. एकदिवसीय प्रवासी विमा
2. सहल स्थळाचा संपूर्ण विमा

7) **सहलस्थळी सुरक्षा व्यवस्था :**

1. पुरेसे सुरक्षारक्षक व गाईड
2. तज्ञ डॉक्टर्स पथक ॲम्ब्यूलन्ससह व प्रथमोपचारासह

8) **पिण्याचे पाणी/बाथरूम :** सहल लाभार्थी संख्येनिहाय पुरेसे

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/–** | **स्वाक्षरी/–** |
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा** |

**शिक्षण मंडळ पुणे महानगरपालिका**

**शिवाजीनगर पुणे 411 005.**

**शैक्षणिक सहली व्यवस्था करणेबाबत निविदा अटी व शर्ती 2010 – 11.**

1. **संदर्भ** :– पुणे दैनिक केसरी व दैनिक बहुजन महाराष्ट्र दिनांक 25/02/2011 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर फेरनिविदा क्र. 02 पुणे षिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक सहली व्यवस्था करणेकामी विहीत नमुन्यातील निविदा फॉर्म व निविदा खालीलप्रमाणे :–
   शिक्षण मंडळ पुणे म.न.पा. शैक्षणिक आर्थिक वर्ष 2010 – 11 करिता खालील स्पेसिफिकेशननुसार व नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून मनपा प्राथमिक शाळांतील शैक्षणिक सहल व्यवस्था विषिष्ट मुदतीत करण्यासाठी निविदा अटी व शर्ती खालील प्रमाणे

**परिषिष्ठ अ**

2. **अटी व शर्ती :–**

1. निविदा सिलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निविदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

2. निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन **'अ'** पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

3. **'अ' पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निविदा रकमेच्या शेकडा 1 टक्का या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅंकेचा मा. षिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (डीडी) जोडावा, दिनांक 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार परिषिष्ट 12 अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निविदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय. युनिट असेल तरीसुध्दा वरील रक्कमा भराव्या लागतील.

**ब)** निविदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र आवश्यक आहे, तसेच त्यामध्ये व्यवसायाच्या स्वरूपाची (षॉप ॲक्ट दाखला) नोंद असणे आवश्यक आहे.

**क)** आर्थिक वर्ष 2009 – 10 मध्ये अद्ययावत सर्व्हीस टॅक्स भरल्याबाबतचा पुरावा जोडावा.

**ड)** षासन/ शासन अंगिकृत व इतर संस्थांना शैक्षणिक सहली व्यवस्था केल्याबाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

**इ)** निविदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाणपत्राची (पॅनकार्ड) छायांकित प्रत.

**ई)** निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पूर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र, तसेच निविदादार शासन/ शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

ए) व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवष्यक.

उ) निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करण्यासंबंधी आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे चालू वर्षाचे प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हसी) निविदेच्या एकूण किंमतीच्या किमान 25 टक्के रक्कमेचे

ऐ) **'अ'** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना षिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे कामी सादर करावी लागतील.

4. पाकीट **'ब'** मध्ये निविदाधारकाने सर्व करासह दर भरावेत व दोन्ही पाकीटे सिलबंद करून एका मोठ्या पाकीटात भरून त्या पाकीटावर निविदाधारकाचे नाव, निविदा क्रमांक नमूद करून तो सिलबंद करून सादर करावा.

5. **'अ'** पाकीटामध्ये आवष्यक ती कागदपत्रे नसल्यास **'ब'** पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत मा. शिक्षण मंडळाचा निर्णय अतिंम राहील.

6. **ब पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे ( परिशिष्ठ ब )**

अ. विहीत नमुन्यातील शैक्षणिक सहली व्यवस्था दर सर्व करासह द्यावेत.

7. **निविदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

1. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. शैक्षणिक सहल व्यवस्था दर अंकी व अक्षरी लिहावेत.

2. निविदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अंषतः मंजूर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

3. निविदेकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रक्कमेत, संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

4. मान्य निविदाधारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन 7 (सात) दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करारनामा करणे बंधनकारक आहे. करारनामा करण्यास निविदादाराने असमर्थता दर्षविल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी षिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

5. मान्य निविदादारास करार करतेवेळी शैक्षणिक सहल व्यवस्था पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा / अनामत रक्कम म्हणून षिक्षण मंडळाकडे धनाकर्षाने (डीडी) भरावा लागेल.

6. निविदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष 2010 – 11 करिताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

7. बयाणा व अनामत रक्कम या दोन्ही एकमेकांपासून पूर्णपणे वेगळया आहेत. सदर रक्कमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

8. **शैक्षणिक सहल व्यवस्था करणेकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विषेष व महत्वाची अट राहिल. मात्र विषेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल.**

9. दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेषनप्रमाणे शैक्षणिक सहल व्यवस्था न केल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास **ब्लॅकलिस्ट** करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहतील. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज

संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

10. करारनाम्यानुसार शैक्षणिक सहल व्यवस्था सर्व करांसह त्या त्या ठिकाणी करण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

11. करारनाम्यानुसार व स्पेसिफिकेषननुसार मुदतीत शैक्षणिक सहल व्यवस्था न केल्यास करारनाम्यानुसार दंड आकारला जाईल.

12. सर्व शैक्षणिक सहल व्यवस्था उत्तमप्रकारे केल्याची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याषिवाय देयक (बील) मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे आगाऊ देयक (बील) मिळणार नाही. कोणासही आगाऊ (ॲडव्हान्स) रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून **आयकर कलम 194 सी नुसार टी.डी.एस.** च्या रकमेची कपात केली जाईल.

13. निविदादाराचे संस्थेला करारनामा करण्यापूर्वी आवष्यकतेनुसार मा. शिक्षण मंडळ किंवा त्यांचे अधिकृत व्यक्ती भेट देईल त्याकामी निविदादाराने योग्य ते सहकार्य केले पाहिजे.

14. एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही एखाद्याला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहतील. तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

15. शैक्षणिक सहल व्यवस्था करणेबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

16. निविदा एकास / अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

17. शैक्षणिक सहल व्यवस्था केलेबाबतची एकत्रित देयक (बील) मा. षिक्षणप्रमुख, षिक्षण मंडळ पुणे म.न.पा. यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शैक्षणिक सहल व्यवस्था केलेबाबतची प्राप्त केलेली चलने संबधित स्वाक्षरी व षिक्क्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील त्याषिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

18. निविदा **शनिवार दि. 05/03/2011 रोजी दुपारी 3.00 वा.** उघडण्यात येतील. वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रषासकीय कारणास्तव त्या दिवषी निविदा न उघडल्यास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनीने कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास वा त्यांचे प्रतिनिधीस हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा**

# प्रतिज्ञालेख

मी,श्री.————————————————————— वय —— वर्ष व्यवसाय – धंदा,राहणार ——————————————————————— निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील निविदा फॉर्मसोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून, त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे.

सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निविदेसोबत दाखल करित आहे.

दिनांक :—

**निविदाधारकाची सही व षिक्का**